# सहकार कायद्यात बदल

**केंद्र सरकार व राज्य सरकार सहकार कायद्यात अमुलाग्र बदल करणार** किंबहुना संपुर्ण देश पातळीवर **एकच सहकारी कायदा लागू करणार** तसेच महाराष्ट्र राज्यात नवीन सहकार कायदा अंमलात आणणार अशा विविध प्रकारच्या घोषणा अनेक मान्यवरांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या आहेत. राज्यातील सहकार चळवळीतील कार्यकर्ते बदलाबाबत वाट पहात आहेत.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ हा सहकार कायदा** आता राज्यकर्त्यांना व तथाकथित **सहकार चळवळीतील धुरीनांना दिवसेंदिवस गैरसोईचा** होत चाललेला आहे. सर्वांना **सहकार चळवळीत स्वातंत्र्य** हवे आहे. परंतु एखादी सहकारी संस्था स्वातंत्र्य देवूनही भविष्यात अडचणीत आल्यानंतर सुध्दा बेबनाव चालूच राहणार आहे. आणि ही मदत ९९ टक्के पेक्षा जास्त धनिकांसाठीच उपलब्ध असते हे या सहकारी चळवळीत अनेक वेळा आम्ही अनुभवले आहे.

राज्यातील पतसंस्थांच्या बाबतीत अनेक **तथाकथित विद्वान व ठेकेदार** ठेवीच्या संदर्भात अत्यंत आग्रही आहेत. त्याचबरोबर पतसंस्थांनी वाटलेल्या कर्जाची वसुली करण्यासाठी **ह्या ठेकेदारांकडे** कुठलीही योजना असल्याचे ऐकीवात नाही. ज्या **पतसंस्थांमधील संचालकांनी स्वतः व नातेवाईकांच्या नावाने भरमसाट रकमा कर्जे घेऊन थकविल्या,** त्या १ टक्के पतसंस्थांच्या बाबतीत बोलले जात आहे. परंतु ९९ टक्के पतसंस्थांनी सभासदांना केलेले कर्ज वाटप जे संचालकांचे नातेवाईक नाहीत, व असे जे कर्ज थकीत झाले ते वसुल करण्यासाठी **ह्या ठेकेदारांकडे** कुठलीही योजना नाही. किंबहुना मायबाप सरकार ह्या ठेकेदाराच्या माध्यमातून ही **थकबाकी वसुलीसाठी योजना आखायला तयार नाही. कारण सरकारला हे काम दुय्यम दर्जाचे वाटते.** जर पतसंस्थांनी अशी थकीत कर्ज वसुली केली आणि अशा पतसंस्था जर आर्थिकदृष्टया सक्षम राहिल्या तर, पतसंस्था चालविणारे कार्यकर्ते राज्यकर्त्यांना विचारणार नाहीत, ही खरी भिती सर्वांची आहे.

**कलम १०१, ९१** इत्यादी अन्वये मिळालेल्या **कर्ज थकबाकी वसुलीच्या दाखल्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सरकार एस. आर. ओ. ची व्यवस्था स्वतःहून करण्यास तयार नाही**. पतसंस्था व त्यांचे फेडरेशन्स, बँका व त्यांचे फेडरेशन्स यांनी एस. आर. ओ. तयार करून त्यांचेमार्फत वसुली करावी ही शासनाची भूमिका वरकरणी जरी व्यवहारिक असली तरी, शासन त्यांच्या **एस. आर. ओ. सोबत मागताक्षणी पोलिस संरक्षणासाठी यंत्रणा उभी करायला तयार नाही.** एवढ्यावरच शासन थांबले नसून १०१ अंतर्गत मिळालेल्या दाखल्यावर बेकायदेशीरपणे स्थगिती देत आहे. आणि हे करीत असताना ५० टक्के रक्कम सुध्दा कायद्याप्रमाणे भरून न घेता स्थगिती देऊन सरकारचे पगारी अधिकारी नियमितपणे कायदा हातात घेत आहेत. यासाठी सहकार कायद्यात बदल कसा होणार आणि यासाठी **जनतेकडून सुचना व हरकती केव्हा मागविल्या जाणार** याची आम्ही वाट पाहत आहोत. कारण तोट्यात असलेली कुठल्याही प्रकारची सहकारी संस्था किती वर्षांनी गुंडाळायची याची कायद्यात तरतुद होणे आवश्यक आहे. साखर कारखाने / सुतगिरण्या यांना वेगळे धोरण व पतसंस्था / बँकांना वेगळे धोरण या विरोधात या बदलाच्या वेळी आम्ही निश्चितपणे उठाव करणार आहे. राज्यातील साखर कारखान्यांनी वर्षानुवर्षे सभासदांचे ठेवीवरील व्याज व ठेवी मागणी करुनही दिल्या नसताना एकाही साखर कारखान्याचे संचालक मंडळ ह्या कारणास्तव बरखास्त करण्यात आलेले नाही. सभासदांच्या ठेवी व व्याज दिले नाही म्हणून कुठल्याही साखर कारखान्याच्या संचालकांना या राज्यात अद्याप जेलमध्ये डांबलेले नाही. हा विरोधाभास **वरील ठेकेदारांच्या ठेवी संरक्षणाच्या कार्यक्रमात अद्याप कसा बसला नाही हे राज्यातील १२ कोटी जनतेला समजणे आवश्यक आहे.** कारण पतसंस्था / बँकांमध्ये ठेवलेली ठेव न मिळणे व साखर कारखान्यात असलेली ठेव न मिळणे दोन्ही विषय हे एकच आहेत. शिवाय हे साखर कारखाने गेली

**२५-२५ वर्षे नियमितपणे तोटयात** आहेत. शिवाय हे कारखाने राखीव निधीची व इतर निधीची कायद्याप्रमाणे कुठेही गुंतवणूक करीत नाहीत. सभासद शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून परस्पर कपात केलेली शासकीय रक्कम सुध्दा हे कारखाने शासनाच्या तिजोरीत भरीत नाहीत. किंबहुना ह्या रकमा शासनाला देण्यासाठी हे कारखाने बँकांकडून कर्जे घेतात, यापेक्षा उन्मत्तपणा व **राज्यातील ९९ टक्के लोकांच्या आर्थिक जीवनाशी खेळणारा कारभार ह्या ठेकेदारांच्या कशा लक्षात येत नाही हा आमच्यापुढे प्रश्न आहे.**

आम्हास पूर्ण खात्री आहे की, देशात एकच सहकार कायदा येवो किंवा राज्यात स्वतंत्र कायदा येवो किंवा विद्यमान सहकार कायद्यात दुरस्ती होवो. सर्वांचा मतितार्थ एकच आहे की, **ज्यांनी पद्धतशीरपणे कुटील कारस्थान करुन केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नाबार्डला पुढे करुन हजारो करोड रुपये शासनाच्या तिजोरीतून पद्धतशीरपणे लाटले,** त्यांना भविष्यात अशा पद्धतीने जनतेच्या पैशावर डल्ला मारण्यासाठी पळवाट ठेवू नये. यासाठी भविष्यात नवीन सहकार कायदा जेव्हा अस्तित्वात येईल त्या बदलाच्या वेळी, सुचना व हरकतीच्या वेळी अभ्यासपूर्वक व जागरुकपणे विरोध करायला पाहिजे. अन्यथा हे सर्व बदल पुन्हा लुटारांच्या फायदयासाठी होणार व हे लुटारु ९९ टक्के सहकारी कार्यकर्त्यांवर अमानुषपणे अन्याय करणार यापेक्षा वेगळे काही घडणार नाही. म्हणून **आमच्या बरोबर आपणही मुकाबला करण्यासाठी सज्ज व्हावे असे या निमित्ताने आवाहन** करीत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**